श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

इयत्ता – सातवी (16 जून) विषय – मराठी

Subscribe

शाळापूर्व तयारी – उपचारात्मक ब्रीज कोर्स (15 ते 30 जून)

मागील इयत्तेच्या अध्ययन निष्पत्तीवर आधारित अभ्यासक्रम समाविष्ट

- स्वाध्याय सराव करा.

व्हिडिओ पहा

स्वाध्याय

प्र. १. चार–पाच वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) मुले सायकलचा वापर कशाकशासाठी करतात?

(आ) सायकल चालवणाऱ्याला वेगळा व्यायाम करण्याची गरज पडणार नाही असे का म्हटले आहे?

(इ) सायकलच्या रूपात कसा कसा बदल होत गेला?

प्र. २. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.

(अ) आठवड्यातून एक दिवस स्वतःचे वाहन न वापरता, सार्वजनिक वाहनानेच प्रवास करायचा असे सर्वांनी ठरवले, तर कोणकोणते फायदे होतील?

(आ) तुमच्या कुटुंबातील, परिसरातील व्यक्तींनी सायकलचा वापर करावा यासाठी तुम्ही कोणकोणते प्रयत्न कराल ?

प्र. ३. खालील आकृतीत दिलेल्या मुद्द्यांप्रमाणे सायकल चालवण्याचे फायदे लिहा.

प्र. ४. सायकलचे निरीक्षण करा व तिच्या भागांची नावे लिहा.

प्र. ५. सायकल शिकताना तुम्हांला आलेले अनुभव आठ ते दहा वाक्यांत लिहा.

प्र. ६. संगणक तुमच्याशी बोलू लागला तर.... कल्पना करा व लिहा.

प्र. ७. सायकल व मोटारसायकल यांचा संवाद आठ ते दहा ओळींत लिहा.

दिलेली माहिती समजून घ्या.

टेस्ट सोडवा

जाणून घेऊया.

प्रतल



शेजारील चित्रातील तीनही आकृत्यांचे पृष्ठभाग कसे आहेत ?

पहिल्या दोन चित्रांतील पृष्ठभाग सपाट आहेत. हा सपाट पृष्ठभाग, एका अमर्याद पृष्ठाचा भाग आहे. **सपाट पृष्ठभागाला गणिती भाषेत प्रतल म्हणतात.**

शेजारील आकृतीतील प्रतलाचे नाव 'H' आहे. प्रतलाची आकृती मर्यादित काढलेली असली तरी प्रतल चोहोबाजूंना अमर्याद असते. प्रतल सर्व दिशांना अमर्याद आहे, हे बाणांनी दाखवले जाते. परंतु अनेकदा सोईसाठी हे बाण काढले जात नाहीत.





समांतर रेषा

शेजारील चित्रातील वहीचे पान पाहा. वहीचे पान हा प्रतलाचा भाग आहे का? वहीच्या पानावरील आडव्या रेषा वाढवल्या, तर एकमेकींना मिळतात का?

हे मला समजले.

एका प्रतलात असलेल्या व एकमेकींना न छेदणाऱ्या रेषांना समांतर रेषा असे म्हणतात.

Let's discuss.

टेस्ट सोडवा

Let's learn.

Planes

Look at the pictures. What kind of surfaces do you see?

The surfaces in the first two pictures are flat. Each flat surface is a part of an infinite surface. In mathematics, a flat surface is called a plane.



The name of the plane in the picture is 'H'. Even though we draw a suitably small figure of the plane, it actually extends infinitely on all sides. Arrows are drawn to show that the plane extends infinitely in all directions. However, these arrows are often omitted for the sake of convenience.





Parallel Lines

Look at this page from a notebook. Is this page a part of a plane? If we extend the lines that run sideways on the page, will they meet each other somewhere?

Now I know –

Lines which lie in the same plane but do not intersect are said to be parallel to each other.

- Read and repeat. (वाचा आणि म्हणा .)

व्हिडिओ पहा

2. **Good handwriting :** Observe the letters on the board carefully. Write the small and capital letters in proper proportion.



Write the small and capital letters in proper proportion.

टेस्ट सोडवा

भारतीय इतिहासाच्या जडणघडणीचा विचार केला असता खालील सहा भूप्रदेश महत्त्वाचे ठरतात.

१. हिमालय
२. सिंधु–गंगा–ब्रह्मपुत्रा नद्यांचा मैदानी प्रदेश
३. थरचे वाळवंट
४. दख्खनचे पठार
५. समुद्रकिनाऱ्यांचे प्रदेश
६. समुद्रातील बेटे

हिमालय पर्वत

१. हिमालय : हिंदुकुश व हिमालय पर्वतामुळे भारतीय उपखंडाच्या उत्तरेला जणू एक अभेद्य भिंतच उभी राहिलेली आहे. या भिंतीमुळे भारतीय उपखंड मध्य आशियातील वाळवंटापासून अलग झालेला आहे. मात्र हिंदुकुश पर्वतातील खैबर, बोलन या खिंडींमधून जाणारा खुश्कीचा व्यापारी मार्ग आहे. मध्य आशियातून जाणाऱ्या प्राचीन व्यापारी मार्गाशी तो जोडला गेलेला होता. चीनपासून निघून मध्य आशियातून अरबी प्रदेशापर्यंत जाणारा हा व्यापारी मार्ग 'रेशीम मार्ग' म्हणून ओळखला जातो. कारण या मार्गावरून पश्चिमेकडील देशांत पाठवल्या जाणाऱ्या मालात रेशीम प्रमुख होते. याच खिंडीतील मार्गावरून अनेक परदेशी आक्रमकांनी प्राचीन भारतात प्रवेश केला. अनेक परदेशी प्रवासी या मार्गाने भारतात आले.

वाचून समजून घ्या.

टेस्ट सोडवा

वाचा व समजून घ्या.

भौगोलिक स्पष्टीकरण

❋ अक्षवृत्ते

तुमच्या असे लक्षात आले असेल की 'क्ष' पासून क१ व 'क्ष' पासून प२ ही अंतरे सारखीच आहेत. परंतु २०° ला जोडून काढलेले लंबवर्तुळ, हे ६०° ला जोडून काढलेल्या लंबवर्तुळापेक्षा मोठे आहे. गोल आकारामुळे असे होते. हे लक्षात घ्या. पृथ्वीबाबतही असेच होते. आकृत्यांमध्ये जरी या रेषा लंबवर्तुळ दिसत असल्या तरी पृथ्वीगोलावर मात्र त्या वर्तुळाकार असतात. या वर्तुळांना अक्षवृत्त असे म्हणतात. अक्षवृत्ते ही कोनीय अंतर मोजून काढलेली असल्यामुळे त्यांची मूल्ये अंशात सांगितली जातात. या मूल्यांना अक्षांश असे म्हणतात. सर्व अक्षवृत्ते एकमेकांना समांतर असतात.



आकृती १.५ : अक्षवृत्ते

आकृती १.५ मध्ये दाखवल्याप्रमाणे विषुववृत्तीय प्रतलापासून अक्षांशाचे कोन मोजले जातात. त्यामुळे विषुववृत्त हे ०° चे अक्षवृत्त समजतात. त्याला मूळ अक्षवृत्त असेही म्हणतात. हे सर्वांत मोठे अक्षवृत्त (बृहतवृत्त) आहे. विषुववृत्तापासून उत्तरेकडे व दक्षिणेकडे अक्षवृत्तांचे मूल्य वाढत जाते.

मृदा तयार होण्याची क्रिया

जमिनीवरील मृदा ही नैसर्गिक प्रक्रियेतून निर्माण होते. मूळ खडकाच्या अपक्षयातून मृदेसाठी अजैविक घटकांचा पुरवठा होतो. ऊन, वारा व पाऊस यांपासून निर्माण होणाऱ्या उष्णता, थंडी व पाण्यामुळे मूळ खडकांचे तुकडे होतात. त्यांपासून खडे, वाळू, माती तयार होते. या घटकांमध्ये सूक्ष्मजीव, कृमी, कीटक आढळतात. उंदीर-घुशींसारखे कृदंत प्राणीही आढळतात. तसेच जमिनीवरील झाडांची मुळेदेखील खडकाच्या अपक्षयास मदत करतात. मृदानिर्मितीची प्रक्रिया मंद गतीने सतत सुरू असते. परिपक्व मृदेचा २.५ सेमीचा थर तयार होण्यासाठी सुमारे हजार वर्षे लागतात.

पूरपरिस्थिती, वादळी वारे आणि मानवाच्या खाणकामासारख्या कृतींमुळे मृदा अल्पावधीत नष्ट होऊ लागते. म्हणूनच मृदा संधारण करणे, जमिनीची धूप थांबवणे आवश्यक असते. यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे जमिनीवरील वनस्पतींचे आच्छादन वाढवणे. गवत, झाडे, झुडपे वाढवल्यास जमिनीची धूप कमी होते.

करून पहा.

तुमच्या परिसरातील वेगवेगळी ठिकाणे जसे, अंगण, बाग, डोंगर, नदीकाठ, शेती व खडकाळ जमीन येथील मृदेचे नमुने मिळवून त्यांतील फरक रंग, स्पर्श व कणांचा आकार या मुद्द्यांच्या आधारे निरीक्षण करून नोंदवा.

टेस्ट सोडवा

माहीत आहे का तुम्हांला?

मृत वनस्पती व प्राणी यांचे सूक्ष्मजीवांमार्फत विघटन होऊन म्हणजेच ते कुजून, मृदेवर जो थर तयार होतो, त्याला कुथित मृदा (ह्युमस) म्हणतात. कुथित मृदा जमिनीला पोषक घटक पुरवण्याचे काम करते. तसेच मृदेत हवा खेळती ठेवणे, मातीत पाणी धरून ठेवणे या कामीदेखील कुथित मृदा महत्त्वाची आहे. चांगल्या सुपीक मृदेमध्ये वरच्या थरात कुथित मृदेचे प्रमाण सुमारे ३३% ते ५०% असते.

जरा डोके चालवा.

मृदेमधील विविध घटक कोणते? त्यांचे जैविक व अजैविक असे वर्गीकरण करा.

मृदेमधील विविध घटक कोणते?

....

....

....

....

The process of soil formation

The soil on the land is formed by a natural process. The abiotic components of soil are supplied through the weathering of the bedrock. Due to the heat, cold and water of the sun, wind and rain respectively, the bedrock breaks down into pieces. Stones, sand and soil are formed from these pieces. Microbes, worms and insects are found among them. Rodents like mice and rats are also found here. The roots of trees growing on the land also help weathering of rocks. The process of soil formation is slow and continuous. It takes about a thousand years for a 2.5 cm thick layer of mature soil to form.

Soil can get destroyed in a short period due to floods, storms and human activities such as mining. That is why, it is necessary to conserve soil and to prevent erosion of land. The best remedy for this is to increase the green cover of the land. Erosion of land is reduced if grass, trees and bushes are grown in it.

Try this.

Obtain specimens of soil from various places in your surroundings such as your own yard, a garden, hills, river banks, fields and rocky ground. Note the differences in the specimens with respect to colour, feel, texture and the size of the particles.

Do you know ?

Humus is the layer formed on soil due to the decomposition of dead plants and animals by microbes. Humus supplies nutrients to the soil. Humus is also important for aerating the soil and for holding water in the soil. The proportion of humus in the upper layer of good fertile soil is about 33% to 50%.

Use your brain power !

What are the constituents of soil? Classify them as biotic and abiotic constituents.

What are the different components of soil?

- चित्र में क्या – क्या दिखाई दे रहा है ,उनपर चर्चा करो और लिखो ।
- दिए गए वाक्यों पर चर्चा करो ।

- **मुलांनो.. हा मुलगा तुम्हाला काहीतरी सांगत आहे. त्याचे जरूर ऐका बरं..**

(व्हिडिओ पाहण्यासाठी चित्राला क्लिक करा.)

घरी रहा...! सुरक्षित रहा...!

माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून				
सातवी मराठी	सातवी गणित	सेमी गणित	सातवी इंग्रजी	सातवी इतिहास
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

सातवी भूगोल	सातवी विज्ञान	सेमी विज्ञान	सातवी हिंदी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.						
पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरून...						
पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा